**विभागीय चौकशी सुरु करण्यासंबंधीचे प्रस्ताव**

1) जेथे आवश्यक आहे तेथे प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे काय ?
2) दोषारोप सिध्द करण्यासाठी पुरेसे पुरावे गोळा करण्यात आले आहेत काय ?
3) पुराव्यासंबंधची मुळ कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन आणि त्यांचे काळजीपुर्वक अवलोकन करुन दोषारोपांची खात्री करुन घेतली आहे काय ?
4) क्षेत्रिय कायालयाने दोषारोप तयार केले असल्यास ते प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर तपासून त्यात आवश्यक तेथे सुधारणा तयार केली असल्याची खात्री केली आहे काय ?
5) दोषारोप ज्ञापनासोबतची तोडपत्रे ही विभागीय चौकशी नियम पुस्तिका, 1991 च्या परिच्छेद 6.4 ते परिच्छेद 6.8 मधील तरतुदीनुसार तयार केली असलयाची खात्री केली आहे काय ?
6) दोषारोपांचे गंाभीर्य विचारात घेऊन व त्यानुसार संभाव्य शिक्षेचे परिमाण विचारात घेऊन नियम 10 व यिम 8 यापैकी योग्य त्या नियमातील तरतुदीनुसार शिक्षाप्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय ? नियम 8 अन्वये चौकशी प्रस्तावित असल्यास दोषारोपाच्या ज्ञापनसोबत विहित चार जोडपत्रे जोडण्यात आली आहेत काय ?
7) सा.प्र.वि कडे प्रस्ताव सादर करतांना शासन नियम व पत्रातील सर्व सूचनांचे पाल करण्यात आले आहे काय ? तसेच तक्त्यास्वरुपात सेवा तपशील उपलब्ध करुन दिला आहे काय ? त्यासोबत कागदपत्रांच्या सर्व प्रती जोडल्या आहेत काय ?
8) संबधित प्रकरणी गुन्हा दाखल केला असल्यास त्याबाबतची सद्यस्थिती प्रस्तावात नमुद केली आहे काय ?
9) प्रस्तावास सा.प्र.वि. ची सहमती प्राप्त झाल्यावर त्यास सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेतली आहे काय ?
10) सेवानिवृत्त अधिका-यांच्या प्रकरणी म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम, 1982 च्या नियम 27 (2) (बी) (दोन) मधील तरतुदीनुसार विहित कालमर्यादेच्या आतील अनियमिततांसाठीच दोषारोप बजण्यात येत असल्याची खात्री करण्यात आली आहे काय ?

प्रशासकीय विभागांनी अनुकंपा नियुक्ती बाबतचे शासन निर्णय/परिपत्रके याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असून विशिष्ट मुद्याबाबत कार्यवाही करतांना अडचणी आल्यास त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून मागदर्शन मागविणे अपेक्षित आहे. हे विचारात घेऊन अुकंपा नियुक्तीबाबतची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागास संदर्भीत करतांना पुढील प्रमाणे निकष विहीत करण्यात यावेत. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मुद्यांची माहिती प्रकरणासोबत पाठवावी व संबधित टिप्पणीत त्यांचा समावेश करावा.

**शिक्षा देण्यासंबंधीचे प्रस्ताव**

1) कर्मचा-यांविरुध्द प्राप्त तक्रार / आरोपांची प्राथमिक चौकशी करुन त्याचे गांभीर्य विचारात घेवुन ते कोणत्या (किरकोळ अगर जबरशिक्षा) प्रकारात मोडतात त्यानुसार विचार करावा. जबरशिक्षा प्रकारांत मोडत असल्यास संबधितास ज्ञापन दोषारोप पत्र देण्यात येवुन जबरशिक्षेची कार्यवाही अम्मलबजावणी करावी.
2) चौकशीचे अभिलेख प्राप्त झाल्यावर, चौकशीची प्रक्रिया नियामान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार पार पाडण्यात आली असल्यास खात्री करावी.
3) अपचा-यास चौकशीच्या वेगवेगळया टप्यावंर नैसर्गिक न्यायानुसार बचावाची संधी देण्यात यावी.
4) चौकशी अहवाल, तो कर्मचा-यास अनुकूल असो वा प्रतिकुल, त्याची प्रत (आवश्यक तेथे असहमतीच्या कारणांसह) अपचा-यास पुरविण्यात यावी.
5) अपचा-याचे अभिवेदन प्राप्त झाल्यावर ते तपासून निष्कर्ष काढण्यात यावे.

6) शिक्षा प्रस्ताव वरिष्ठांकडे सहमतीसाठी सादर करतांना तत्क्याच्या स्वरुपात सेवा तपशील जोडण्यात येवुन प्रस्तावित शिक्षेच्या परिमाणाविषयी समर्थन नमुद करावे.

7) प्रस्तावित शिक्षेचे परिमाण व अपचा-याचा सेवानिवृत्तीचा दिनांक पाहता शिक्षा अंतिम झाल्यास तीची अंमलबजावणी करण्यास सेवा कालावधी शिल्लक असल्याची खात्री करणेत यावी.

8) अंतिरिम शिक्षा प्रस्तावास सक्षम प्राधिका-याची मान्यता प्राप्त करुन घ्यावी.

9) सेवा निवृत्त अधिका-यांच्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील तरतुदी नुसार कार्यवाही करणेत यावी.

10) अपचा-याचे अभिवेदन प्राप्त झाले असल्यास त्याचा विचार करुन अंतिम शिक्षा प्रस्ताव तयार करण्यात यावा.

11) अंतिम शिक्षा प्रस्तावास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी

इत्यादी बाबींची खात्री करुन विहित नियम व शासन निर्णयच्या संदर्भासह वेळोवेळी संचिका / प्रस्ताव सादर करावा.

निलंबन **कालावधीचे नियमन व त्या कालावधीसाठी प्रदान करावयाच्या वेतन भत्यासंबधीचे प्रस्ताव**

1) निलंबन कालावधीचे नियमन व त्या कालावधीत प्रदान करावयाच्या वेतन भत्यासंबधीचा प्रस्ताव म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,1981 मधील संबधित नियम 68 ते 72 मधील तरतुदींचे अवलोकन करुन तयार करावा. व निलंबन भत्याचे वेळोेवेळी पुनर्विलोक करण्यात यावे.

2) संबधितांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली किंवा कसे याबाबत व मा. न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला असल्यास त्याची सद्य:स्थिती नमुद करण्यात यावी.

3) प्रस्तावास प्रदान अधिकारानुसार निंलबित करणारे अधिकरी व त्यांचे वरिष्ठ अधिकरी यंाची सहमती घेण्यात यावी. निलंबनापासुन तीन महिन्यांच्या आंत संबधितास ज्ञापन दोषारोप बजावुन विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत यावी.

4) त्यानंतर आवश्यक त्या प्रकरणी नियम 72 प्रमाणे संबधित कर्मचा-यास नोटीस देण्यात यावी.

5) नोटीशीवर त्याने अभिवेदन सादर केले असल्यास त्याचा विचार करुन अंतिम प्रस्ताव तयार करण्यात यावा.

6) अंतिम प्रस्तावास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी.

7) अंतिम आदेश विनाविंलब निर्गमित करण्यात यावे.